दैनिक
# दिव्य मातृछाया
स्वतंत्र वृत्तपत्र

बुलढाणा | रविवार १२ जुलै २०२६ | www.matruchhaya.in | किंमत रुपये 2/-

वर्ष:-सहावे, अंक:- १२, पाने:- ४, RNI. NO. MAHMAR/2022/87711, मुख्य संपादकः सादिक कुरेशी 9420647272 कार्यकारी संपादक: आसिफ गवळी 9767681555.

## SHORT NEWS

### खासदार अमर काळेंच्या पाठपुराव्याला यश

**दिव्य मातृछाया**

**खामगाव :** परिसरातील शेतकऱ्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून, खासदार अमर काळे यांच्या तत्पर हस्तक्षेपामुळे खरांगणा गोडे सब डिव्हिजनची ए.जी. सिंगल फेज वीज लाईन सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक गावांतील कास्तकारांना मोठा दिलासा मिळाला असून आनंदाचे वातावरण आहे.

खरांगणा गोडे सब डिव्हिजनची ए.जी. सिंगल फेज लाईन तातडीने सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी काँग्रेसचे अतुल पन्नासे यांच्या नेतृत्वाखाली परिसरातील कास्तकारांनी 2 जुलै 2026 रोजी खासदार अमर काळे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले होते. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत खासदार काळे यांनी या मागणीची तात्काळ दखल घेत संबंधित महावितरण विभागाकडे पाठपुरावा सुरू केला.

खासदार अमर काळे यांच्या प्रभावी प्रयत्नांमुळे अवघ्या काही दिवसांत प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेत 8 जुलै 2026 पासून ए.जी. सिंगल फेज लाईन सुरू केली. यामुळे खरांगणा गोडे, वघाळा, तुळजापूर, खडका, चाणकी, कोपरा, पिंपळगाव, शिवनगर आणि हमदापूर या गावांतील शेतकऱ्यांना शेतीसाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे पिकांना वेळेवर पाणी देणे, कृषी पंप सुरू करणे आणि शेतीची कामे नियोजनबद्धपणे करणे आता शक्य होणार आहे

# घाटकट बंधू सोपानदेवांच्या नगरीत माऊलीच्या पालखीचे जल्लोषात स्वागत

**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**सासवड |** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचा आध्यात्मिक आणि भक्तिमय प्रवास सासवड नगरीत मोठ्या उत्साहात पार पडला. घाटकट बंधू सोपानदेव महाराजांच्या पावन भूमीत माऊलीच्या पालखीचे हजारो वारकरी, ग्रामस्थ आणि भाविकांनी "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात जल्लोषपूर्ण स्वागत केले. संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता.




पालखी सासवडमध्ये दाखल होताच रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या भाविकांनी फुलांची उधळण करत माऊलीचे दर्शन घेतले. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन पालखीचे स्वागत केले. ठिकठिकाणी रांगोळ्या, भगवे ध्वज, फुलांची सजावट आणि आकर्षक कमानी उभारण्यात आल्या होत्या. दिंड्यांमधील टाळ-मृदुंगाच्या गजरात आणि हरिनामाच्या अखंड घोषात संपूर्ण सासवड परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला.

यंदाच्या पालखी सोहळ्यात लाखो वारकरी सहभागी झाले असून शिस्तबद्ध पद्धतीने दिंड्यांचे आगमन होत होते. पालखी मार्गावर विविध सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि ग्रामस्थांनी वारकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी, अल्पोपहार, वैद्यकीय सुविधा तसेच विश्रांतीची व्यवस्था केली होती. प्रशासनानेही वाहतूक, सुरक्षा आणि स्वच्छतेसाठी विशेष नियोजन केले होते.

सासवड हे संत सोपानदेव महाराजांच्या स्मृतींनी पावन झालेले स्थान असल्याने या ठिकाणाला वारकरी संप्रदायात विशेष महत्त्व आहे. त्यामुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही माऊलीच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच परराज्यातूनही हजारो भाविक येथे दाखल झाले होते. पालखीच्या स्वागतावेळी भाविकांच्या चेहऱ्यावर भक्तिभाव, समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता.

पालखीचा सासवडमधील मुक्काम भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी कीर्तन, भजन, हरिपाठ आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. वारकऱ्यांनी एकमेकांना सहकार्य करत वारकरी परंपरेतील समता, सेवा आणि बंधुभावाचा संदेश दिला.

यानंतर संत तुकाराम महाराजांची पालखी नियोजित मार्गाने लोणी काळभोरकडे रवाना झाली. पुढे पंढरपूरच्या दिशेने सुरू असलेल्या या वारीत लाखो वारकरी विठ्ठलनामाचा गजर करत मार्गक्रमण करीत असून, महाराष्ट्राच्या समृद्ध संतपरंपरेचा आणि सांस्कृतिक ऐक्याचा अनोखा वारसा पुन्हा एकदा अनुभवायला मिळत आहे.



# मोताळा खामगावला नकोच! बुलढाण्याशीच नाते कायम ठेवा; रविकांत तुपकरांची मुख्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी

**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**बुलडाणा** मोताळा तालुक्याचा प्रस्तावित खामगाव अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समावेश करण्याच्या हालचालींना विरोध करत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मोताळा तालुका बुलडाणा अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातच कायम ठेवण्याची आग्रही मागणी केली आहे. मोताळा ते बुलढाणा हे अवघे २० किलोमीटर अंतर असून, खामगावसाठी नागरिकांना सुमारे ७० किलोमीटरचा प्रवास करावा लागणार असल्याने हा निर्णय सर्वसामान्यांसाठी अत्यंत गैरसोयीचा ठरेल, असे तुपकर यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.



१० जुलै रोजी विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत झालेल्या बैठकीत सरसकट कर्जमुक्ती, पीकविमा आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. याच बैठकीत रविकांत तुपकर यांनी मोताळा तालुक्याच्या प्रशासकीय पुनर्रचनेचा मुद्दाही उपस्थित करत नागरिकांच्या अडचणी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. यासंदर्भात त्यांनी स्वतंत्र निवेदनही सादर केले.

अमरावती विभागातील प्रस्तावित अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांच्या पुनर्रचनेअंतर्गत मोताळा तालुक्याचा खामगाव अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समावेश करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय स्तरावर हालचाली सुरू असल्याची माहिती आहे. मात्र, तालुक्याची भौगोलिक स्थिती, नागरिकांची दैनंदिन प्रशासकीय कामे आणि प्रवासाचा वाढणारा खर्च लक्षात घेता हा निर्णय व्यवहार्य ठरणार नसल्याचे तुपकर यांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले.

तुपकर यांनी निवेदनात नमूद केले की, मोताळा तालुक्यातील नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी बुलढाणा हे अधिक सोयीचे ठिकाण आहे. बुलढाण्यापर्यंतचे अंतर कमी असल्याने वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होते. त्याउलट खामगावला जोडल्यास प्रत्येक शासकीय कामासाठी नागरिकांना मोठा फेरा मारावा लागेल, ज्याचा फटका विशेषतः शेतकरी, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील सर्वसामान्यांना बसणार आहे.

यासोबतच सध्या मोताळा तालुका मलकापूर उपविभागीय कार्यालयाशी जोडलेला असून, त्याऐवजी मलकापूर तालुका बुलढाणा उपविभागीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्याचाही पर्याय विचारात घ्यावा, अशी मागणीही रविकांत तुपकर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. मोताळा तालुक्याच्या प्रशासकीय पुनर्रचनेचा निर्णय घेताना नागरिकांची सोय, भौगोलिक वास्तव आणि प्रशासनाची कार्यक्षमता या सर्व बाबींचा विचार करूनच अंतिम निर्णय घ्यावा, अशी भूमिका तुपकर यांनी बैठकीत मांडली. त्यांच्या या मागणीमुळे मोताळा तालुक्याच्या प्रशासकीय पुनर्रचनेचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे.

# साखरखेर्डा पशुवैद्यकीय दवाखाना महिन्यांपासून बंद
## शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा



**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**साखरखेर्डा :** येथील पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ गेल्या अनेक महिन्यांपासून डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे बंद अवस्थेत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी व पशुपालकांना जनावरांच्या उपचारासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या दवाखान्याअंतर्गत सुमारे २५ गावे येत असून हजारो पशुधन अवलंबून आहे. पावसाळ्यात जनावरांमध्ये आजारांचे प्रमाण वाढत असताना उपचाराची सुविधा उपलब्ध नसल्याने पशुपालकांमध्ये नाराजी आहे. दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक व परिचारकांची तातडीने नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

१५ ऑगस्टपर्यंत दवाखाना सुरू न झाल्यास गुरे-ढोरे घेऊन बेमुदत उपोषण करण्याचा इशारा माजी उपसरपंच गंभीर खरात, दिलीप सोभागे, संदीप मगर व संग्रामसिंह राजपूत यांनी दिला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अन्यथा शेतकऱ्यांच्या संतापाला सामोरे जावे लागेल, अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# डोणगाव वनविभागाचा तपासणी नाका 'रामभरोसे'; अवैध वाहतुकीला मोकळे रान?

**दिव्य मातृछाया**
**विशेष प्रतिनिधी**

**डोणगाव :** बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव राज्य महामार्गावर घाटबोरी वनपरिक्षेत्राच्या अखत्यारित असलेला वनउपज तपासणी नाका सध्या प्रशासकीय अनास्थेमुळे पूर्णपणे निष्क्रिय अवस्थेत असल्याचे चित्र समोर येत आहे. या नाक्यावर वनविभागाचे अधिकारी किंवा कर्मचारी नियमितपणे उपस्थित राहत नसल्याचा थेट आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत असून, यामुळे वनउपज वाहतुकीच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, या तपासणी नाक्यावर अनेकदा एकही कर्मचारी कर्तव्यावर नसतो. परिणामी, वनउपज वाहून नेणाऱ्या वाहनांची कोणतीही तपासणी न करताच ती राजरोसपणे पुढे निघून जातात. कर्मचाऱ्यांच्या या



गायब असण्यामुळे परिसरात अवैध वृक्षतोड, विनापरवाना वनउपज वाहतूक आणि मौल्यवान वनसंपत्तीच्या तस्करीला अप्रत्यक्षपणे मोठे बळ मिळत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे...

भारतीय वन अधिनियम, १९२७ तसेच महाराष्ट्र वन नियमांनुसार वनउपज वाहतुकीवर कडक नियंत्रण ठेवणे, परवान्यांची व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे, आणि अवैध वाहतुकीवर कायदेशीर कारवाई करून वनसंपत्तीचे संरक्षण करणे ही वनविभागाची मुख्य जबाबदारी आहे. याच उद्देशाने हे तपासणी नाके उभारले जातात. मात्र, डोणगाव येथील नाका केवळ नावापुरताच उरला असल्याने शासनाच्या वनसंवर्धनाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याचे



दिसते...

डोणगाव नाक्यावरील या ढिसाळ कारभारामुळे वनविभागाच्या एकूणच कामकाजावर आता मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची तातडीने गंभीर दखल घ्यावी; नाक्यावरील कर्मचाऱ्यांची उपस्थिती, दैनंदिन कामकाज आणि कार्यपद्धतीची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कडक कारवाई करावी, अशी आग्रही मागणी आता नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर वनविभागाची अधिकृत बाजू अद्याप समोर आलेली नाही. संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांचे स्पष्टीकरण आल्यानंतरच या नाक्याचे 'अंधेर नगरी'मागचे खरे कारण स्पष्ट होऊ शकणार आहे.

## संपादकीय

### जलद पैशाचे धोकादायक आकर्षण

स्मार्टफोन आणि इंटरनेटने जग आपल्या हातात आणले आहे. शिक्षण, व्यवसाय, मनोरंजन आणि व्यवहार यांसारख्या अनेक गोष्टी डिजिटल झाल्या आहेत. मात्र या डिजिटल क्रांतीसोबत काही गंभीर धोकेही वाढले आहेत. त्यापैकी एक म्हणजे ऑनलाईन जुगार आणि बेटिंग अॅप्सचे वाढते जाळे. गेल्या काही वर्षांत अशा अॅप्सची संख्या झपाट्याने वाढली असून, विशेषतः तरुण पिढी त्याच्या विळख्यात अडकताना दिसत आहे. जलद पैसे कमावण्याचे स्वप्न दाखवणारी ही व्यवस्था प्रत्यक्षात अनेकांच्या आर्थिक, मानसिक आणि सामाजिक आयुष्याचे नुकसान करत आहे.

आज मोबाईलवर काही मिनिटांत खाते उघडून विविध प्रकारच्या बेटिंग आणि जुगार खेळांमध्ये सहभागी होता येते. क्रिकेट, फुटबॉल आणि इतर क्रीडा स्पर्धांवरील सट्टेबाजी, ऑनलाइन कॅसिनो, कार्ड गेम्स आणि विविध प्रकारच्या पैशांच्या खेळांचे आकर्षण युवकांना सहज भुरळ घालत आहे. सुरुवातीला छोट्या रकमेपासून सुरू होणारा हा खेळ अनेकदा मोठ्या आर्थिक नुकसानीपर्यंत पोहोचतो. काही वेळा सुरुवातीला मिळणाऱ्या छोट्या यशामुळे लोकांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते अधिक मोठ्या रकमा गुंतवू लागतात. याच ठिकाणी संकटाची सुरुवात होते.

या अॅप्सचा सर्वात धोकादायक भाग म्हणजे त्यांची विपणन पद्धत. मोठ्या जाहिराती, सेलिब्रिटींचे प्रमोशन, सोशल मीडियावरील प्रभावी मोहिमा आणि "सोप्या पद्धतीने पैसे कमवा" अशा संदेशांद्वारे युवकांना आकर्षित केले जाते. अनेक वेळा या जाहिरातींमध्ये जोखीम स्पष्टपणे सांगितली जात नाही. परिणामी, अनेक तरुण याकडे गुंतवणूक किंवा उत्पन्नाचे साधन म्हणून पाहू लागतात. प्रत्यक्षात मात्र जुगार हा कौशल्यापेक्षा नशिबावर आधारित खेळ असतो आणि दीर्घकालीन फायद्याची हमी त्यात नसते.

ऑनलाईन जुगाराचा परिणाम केवळ आर्थिक नुकसानापुरता मर्यादित राहत नाही. अनेक युवक कर्जबाजारी होतात, बचत गमावतात आणि कुटुंबीयांपासून गोष्टी लपवू लागतात. काही प्रकरणांमध्ये तर आर्थिक तणावामुळे मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम झाल्याचे दिसून आले आहे. चिंता, नैराश्य आणि सामाजिक एकाकीपणा यांसारख्या समस्या वाढतात. काहीजण नुकसान भरून काढण्यासाठी पुन्हा अधिक पैसे लावतात आणि त्यातून एक दुष्टचक्र निर्माण होते.

कुटुंबांवरही या समस्येचा मोठा परिणाम होतो. घरातील कमाईचा मोठा भाग जुगारात खर्च होऊ लागल्यास आर्थिक नियोजन कोलमडते. कुटुंबातील विश्वास कमी होतो आणि अनेकदा वाद-विवाद वाढतात. काही प्रकरणांमध्ये तर जुगाराच्या व्यसनामुळे कुटुंबे आर्थिक संकटात सापडल्याची उदाहरणे समोर आली आहेत. त्यामुळे ही केवळ वैयक्तिक समस्या नसून सामाजिक समस्या बनली आहे.

या पार्श्वभूमीवर सरकारसमोर मोठे आव्हान उभे आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मवर चालणाऱ्या जुगार आणि बेटिंग सेवांवर नियंत्रण ठेवणे सोपे नाही. अनेक अॅप्स परदेशातून चालवली जातात किंवा सतत आपले स्वरूप बदलत असतात. तरीही कठोर नियमन, आर्थिक व्यवहारांवर लक्ष आणि बेकायदेशीर प्लॅटफॉर्मविरोधात कारवाई आवश्यक आहे. यासोबतच जाहिरातींवरही नियंत्रण आणण्याची गरज आहे, विशेषतः अशा जाहिराती युवकांना लक्ष्य करत असतील तर.

शैक्षणिक आणि सामाजिक पातळीवर जनजागृती करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शाळा, महाविद्यालये आणि पालकांनी युवकांना जुगाराचे धोके समजावून सांगितले पाहिजेत. आर्थिक साक्षरता वाढवणे आणि पैशाचे नियोजन शिकवणे ही काळाची गरज आहे. जलद श्रीमंत होण्याच्या मोहापेक्षा मेहनत, कौशल्य आणि दीर्घकालीन नियोजन यांचे महत्त्व तरुणांना पटवून देणे आवश्यक आहे.

सोशल मीडियाची भूमिकाही येथे महत्त्वाची आहे. आज अनेक युवकांना ऑनलाइन जुगाराचे आकर्षण सोशल मीडिया इन्फ्लुएंसर्स आणि जाहिरातींमधून मिळते. त्यामुळे डिजिटल प्लॅटफॉर्मनीही सामाजिक जबाबदारी स्वीकारून अशा सामग्रीवर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

ऑनलाईन जुगार आणि बेटिंग अॅप्स हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या चुकीच्या वापराचे उदाहरण आहे. ज्या तंत्रज्ञानाचा वापर शिक्षण, व्यवसाय आणि प्रगतीसाठी होऊ शकतो, त्याच तंत्रज्ञानाद्वारे अनेक युवक आर्थिक आणि मानसिक संकटात सापडत आहेत. हा धोका वेळेत ओळखला नाही, तर त्याचे परिणाम अधिक गंभीर होऊ शकतात.

आज गरज आहे ती कठोर नियमन, व्यापक जनजागृती आणि सामाजिक जबाबदारीची. कारण ऑनलाईन जुगाराचा प्रश्न हा केवळ पैशांचा नाही; तो देशाच्या तरुणाईच्या भविष्याशी संबंधित आहे. जलद पैशाच्या मोहात अडकलेल्या युवकांना योग्य दिशा देणे आणि त्यांचे भविष्य सुरक्षित ठेवणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

# मेहकरमध्ये उघड्यावर, अस्वच्छ पद्धतीने होणारी मांस विक्री तत्काळ बंद करा!

## भाजप तालुकाध्यक्ष आकाश सास्ते पाटील यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन; कायदेशीर कारवाईची मागणी

**दिव्य मातृछाया**
**शहर प्रतिनिधी**

**मेहकर:** शहरातील विविध भागांत उघड्यावर आणि अत्यंत अस्वच्छ पद्धतीने होत असलेली मांस विक्री तत्काळ बंद करून संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी भारतीय जनता पार्टीचे मेहकर तालुकाध्यक्ष आकाश सास्ते पाटील यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधत त्यांनी तातडीने पावले उचलण्याची मागणी केली आहे.

मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात आकाश सास्ते पाटील यांनी नमूद केले आहे की, शहरात अनेक ठिकाणी उघड्यावर व अस्वच्छ वातावरणात मांस विक्री केली जात आहे. यामुळे सार्वजनिक आरोग्यास मोठा धोका निर्माण झाला असून परिसरात दुर्गंधी, घाण आणि माश्यांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तसेच, या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांच्या धार्मिक भावनाही दुखावल्या जात आहेत. ही बाब महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९८९ आणि अन्न सुरक्षा व मानके नियम २०११ (FSSAI) च्या विविध कायदेशीर तरतुदींचे सरळ सरळ उल्लंघन करणारी आहे.




**निवेदनातील प्रमुख मागण्या:**

**तात्काळ तपासणी:** शहरात उघड्यावर व अस्वच्छ पद्धतीने सुरू असलेल्या मांस विक्रीची प्रशासनाने तात्काळ चौकशी व तपासणी करावी.

दंडात्मक कारवाई: परवान्याशिवाय बेकायदेशीर व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर दंडात्मक व कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

**नियमांचे पालन:** सर्व मांस विक्रेत्यांना FSSAI व नगरपालिका नियमांचे काटेकोर पालन करण्याचे कडक निर्देश देण्यात यावेत.

**नियमित मोहीम:** भविष्यात अशी बेकायदेशीर विक्री होऊ नये यासाठी प्रशासनाने नियमित तपासणी मोहीम राबवावी.

या गंभीर विषयाची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा आकाश सास्ते पाटील यांनी व्यक्त केली आहे. या निवेदनाच्या प्रती योग्य त्या कारवाईसाठी जिल्हाधिकारी बुलढाणा, अन्न व औषध प्रशासन (FDA) सहाय्यक आयुक्त आणि जिल्हा शल्यचिकित्सक यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित

निवेदन देताना भाजपचे जिल्हा सचिव विजयभाऊ पवार, जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप ईलग, तालुकाध्यक्ष आकाश सास्ते पाटील, तालुका उपाध्यक्ष विजयजी वायाळ, कैलास देशमुख, शहराध्यक्ष शिल्पाताई देशमुख, शहर उपाध्यक्ष रवी गाडेकर, इंजिनीयर सेलचे तालुका अध्यक्ष अमोल पोधाडे, धीरज आसाबे, अल्पसंख्यांक शहराध्यक्ष हुसेन परसुवाले, सर्वेश वानखेडे पाटील, अजय सास्ते, ओम सास्ते, वैभव सास्ते, कार्तिक चेके, हर्षल सास्ते, शुभम वानखेडे, प्रमोद घायाळ यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कु-हा येथे अप्पर तहसीलदार कार्यालयाच्या प्रस्तावाला वेग

## नागरिकांना मिळणार महसुली सेवांचा दिलासा

**दिव्य मातृछाया**
**अतिक खान**

**मुक्ताईनगर :** मुक्ताईनगर तालुक्यातील कु-हा येथे अप्पर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्याच्या प्रस्तावाला गती मिळाली असून, महसूल विभागाकडून आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या कार्यालयाच्या स्थापनेमुळे परिसरातील हजारो नागरिकांना महसूल विभागाशी संबंधित विविध कामांसाठी मुक्ताईनगर तहसील कार्यालयात वारंवार जावे लागणार नाही. त्यामुळे वेळ, श्रम आणि आर्थिक खर्चाची मोठी बचत होणार असल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांत पाटील यांनी कु-हा येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू करण्याची मागणी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पत्राद्वारे केली होती. या मागणीची दखल घेत महसूल विभागाने संबंधित प्रस्ताव तयार




करून सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाला आवश्यक सूचना दिल्या. त्यानंतर मुक्ताईनगर तहसील कार्यालयाने कु-हा परिसराची भौगोलिक परिस्थिती, लोकसंख्या, महसुली कामकाजाचा व्याप, नकाशे तसेच इतर आवश्यक माहिती संकलित करून प्रस्ताव पुढील प्रशासकीय स्तरावर पाठविल्याची माहिती मिळाली आहे.

कु-हा हे मुक्ताईनगर तालुक्यातील महत्त्वाचे केंद्र असून परिसरातील अनेक गावांतील नागरिकांना सातबारा उतारा, फेरफार, वारसा नोंद, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला आणि इतर महसुली कामांसाठी मुक्ताईनगर तहसील कार्यालयात जावे लागते. तालुक्याचा भौगोलिक विस्तार मोठा असल्याने दुर्गम भागातील नागरिकांना लांबचा प्रवास करावा लागत असून त्यासाठी वेळ आणि खर्चही अधिक होत आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवर अप्पर तहसीलदार कार्यालयाची मागणी अनेक वर्षांपासून सातत्याने केली जात होती.

प्रस्तावाला अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर कार्यालयासाठी जागा निश्चित करणे, इमारत उभारणी, अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती तसेच आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया हाती घेतली जाणार आहे. हे कार्यालय सुरू झाल्यानंतर महसुली सेवा अधिक जलद, पारदर्शक आणि सुलभ होतील. तसेच शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासही मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

स्थानिक नागरिकांनी या प्रस्तावाचे स्वागत करत शासनाने लवकरात लवकर अंतिम मंजुरी देऊन कार्यालय कार्यान्वित करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. कु-हा येथे अप्पर तहसीलदार कार्यालय सुरू झाल्यास मुक्ताईनगर तालुक्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून स्थानिक प्रशासनाची कार्यक्षमताही अधिक बळकट होणार आहे.

# सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण

## 'सेवा'मुळे दोन वृद्धांना मिळाले सुरक्षित आयुष्य



**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**बुलढाणा** उपचार पूर्ण झाल्यानंतर घरी नेण्यासाठी कोणीही नातेवाईक नसलेल्या दोन निराधार वृद्धांना सेवा फाउंडेशन बुलढाणाने सुरक्षित निवारा उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत असलेले भीमराव कांबळे आणि तोताराम मापारी यांचे पुनर्वसन करण्यासाठी फाउंडेशनने पुढाकार घेत त्यांना सेवा प्रकल्प आश्रम, पळसखेड येथे दाखल केले.

या उपक्रमासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय प्रशासनाने मोलाचे सहकार्य केले. राजमाता जिजाऊ वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. झीने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. गौरव सराफ यांच्यासह डॉक्टर, परिचारिका आणि रुग्णालय कर्मचाऱ्यांनी आवश्यक वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली.

सेवा फाउंडेशनचे निखिल जालान, अभिषेक चोपडा, सोहेल बुधवानी, रितेश खडके जैन, आनंद माधवानी आणि अक्षय देशलहरा यांनी दोन्ही वृद्धांना सुरक्षितपणे आश्रमात पोहोचविले. निराधार व गरजू व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी सेवा फाउंडेशनकडून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आश्रमात दाखल झाल्यानंतर दोन्ही वृद्धांच्या निवास, भोजन, आरोग्य तपासणी आणि दैनंदिन देखभालीची जबाबदारी सेवा प्रकल्प आश्रमाने स्वीकारली आहे.

# समीर शेख यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या(अ.प.) खामगांव तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती

**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**खामगांव** खामगांव तालुक्यातील राजकीय क्षेत्रातून एक महत्त्वाची बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला गती देण्यासाठी आणि पक्षाचा तळागाळातील विस्तार करण्यासाठी मा. आमदार दिलीप कुमार सानंदा यांचे खंदे समर्थक समीर शेख यांची खामगांव तालुका उपाध्यक्षपदी अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाचे वरिष्ठ नेते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक सेलचे प्रदेशाध्यक्ष तथा



जिल्हाध्यक्ष बुलढाणा अॅड. नाझेर काजी खामगांव विधानसभा मतदारसंघाचे मा. आमदार दिलीपकुमार सानंदा तथा प्रमुख पदाधिकारी आणि स्थानिक नेत्यांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीचे पत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

नियुक्तीनंतर समीर शेख यांची

**कार्यकर्त्यांकडून जल्लोष.......**

समीर शेख यांच्या निवडीची घोषणा होताच खामगाव तालुक्यातील त्यांच्या समर्थक आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आणि पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. सोशल मीडियावरही त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या नियुक्तीमुळे खामगांव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास स्थानिक राजकीय वर्तुळातून व्यक्त केला जात आहे.

या निवडीबद्दल बोलताना समीर शेख यांनी पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले. ते म्हणाले,
"पक्षाने माझ्यावर जो विश्वास दाखवून ही जबाबदारी दिली आहे, तिला मी पूर्ण न्याय देण्याचा प्रयत्न करेन. खामगाव तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि तरुणांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी सदैव तत्पर राहीन. पक्षाची ध्येयधोरणे लोकांपर्यंत पोहोचवणे हेच माझे मुख्य उद्दिष्ट असेल."

DAILY DIVYA MATURCHHAYA -Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by Shaikh Sadik Shaikh katthu Qureshi Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at At.Post. Malipeth, Imam Baba Chowk Mehkar, Tq.Mehkar, Dist. Buldana-443301(Mah.)Editor SHAIKH SADIK SHAIKH KATTHU QURESHI Mob.No.9420647272 RNI.NO.MAHMAR/2022/87711 हे प्रकाशक, मालक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कायार्लयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मु.पो. माळीपेठ, इमाम बाडा चौक, (टिपः- प्रकाशित झालेल्या जाहिरातीची जबाबदारी प्रकाशकाची नाही.) मेहकर, ता. मेहकर, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक शेख सादीक शेख कठ्ठु कुरेशी मोबा. 9420647272 पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत

## ■ थोडक्यात




### विदर्भातही धावणार बुलेट ट्रेन? आमदार सिद्धार्थ खरात यांची विधानसभेत जोरदार मागणी

**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**मेहकर :** महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भ आणि मराठवाड्यातील रेल्वे कनेक्टिव्हिटीचा महत्त्वपूर्ण मुद्दा आमदार सिद्धार्थ खरात यांनी उपस्थित केला. नागपूर-मुंबई प्रस्तावित हायस्पीड रेल्वे अर्थात बुलेट ट्रेन प्रकल्पाचा लाभ विदर्भातील मागास व रेल्वे सुविधांपासून वंचित असलेल्या भागांना मिळावा, अशी जोरदार मागणी त्यांनी सभागृहात केली.

यासोबतच मेहकर, लोणार, सिंदखेडराजा, रिसोड, शिरपूर आणि वाशीम या महत्त्वाच्या शहरांना जोडणारा नवीन रेल्वे मार्ग उभारण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला. या रेल्वे मार्गामुळे पर्यटन, व्यापार, उद्योग, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळणार असल्याचे आमदार खरात यांनी स्पष्ट केले.

विधानसभेत बोलताना आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांगितले की, बुलढाणा आणि वाशीम जिल्ह्याचा भौगोलिक व ऐतिहासिकदृष्ट्या मोठा महत्त्व आहे. मात्र, आजही या भागातील अनेक शहरांना थेट आणि प्रभावी रेल्वे संपर्क उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, शेतकऱ्यांना कृषी माल वाहतुकीसाठी, व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी आणि सर्वसामान्य नागरिकांना प्रवासासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

सध्या प्रस्तावित असलेला खामगाव-जालना रेल्वे मार्ग हा निश्चितच महत्त्वाचा प्रकल्प आहे. मात्र, त्यासोबतच बुलढाणा जिल्ह्यातील इतर महत्त्वाच्या भागांना जोडण्यासाठी स्वतंत्र रेल्वे मार्गाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

**पर्यटन विकासाला मिळणार मोठी चालना**

राष्ट्रमाता जिजाऊंचे जन्मस्थान असलेले सिंदखेडराजा, जागतिक स्तरावर प्रसिद्ध असलेले लोणार विवर-सरोवर, धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व असलेले मेहकर तसेच रिसोड, शिरपूर आणि वाशीम ही शहरे रेल्वे मार्गाने जोडल्यास या भागातील पर्यटन क्षेत्राला मोठी गती मिळेल, असे आमदार खरात यांनी सांगितले.

लोणार विवर हे जगभरातील पर्यटकांचे आकर्षण केंद्र आहे. मात्र, रेल्वे सुविधा मर्यादित असल्यामुळे अनेक पर्यटकांना या भागात पोहोचण्यासाठी अतिरिक्त प्रवास करावा लागतो. जर आधुनिक रेल्वे सुविधा उपलब्ध झाली तर देश-विदेशातील पर्यटकांची संख्या वाढेल आणि स्थानिक पातळीवर रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील, असेही त्यांनी नमूद केले.

सिंदखेडराजा हे राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जन्मस्थळामुळे ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे आहे. या ठिकाणी देशभरातून पर्यटक आणि भाविक येतात. त्यामुळे या भागाला रेल्वे नेटवर्कशी जोडणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

**बुलेट ट्रेन प्रकल्पात विदर्भाचा विचार करण्याची मागणी**

नागपूर-मुंबई प्रस्तावित हायस्पीड रेल्वे प्रकल्पामुळे राज्यातील वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. मात्र, या प्रकल्पाच्या नियोजनात विदर्भातील बुलढाणा, वाशीम आणि लगतच्या भागांचा विचार करण्यात यावा, अशी मागणी आमदार खरात यांनी केली.

समृद्धी महामार्गामुळे महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे. त्याच धर्तीवर आधुनिक आणि जलद रेल्वे कनेक्टिव्हिटी उभारल्यास विदर्भातील औद्योगिक, कृषी आणि पर्यटन विकासाला मोठी मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये उद्योग, शेती आणि पर्यटनाची मोठी क्षमता आहे. मात्र, योग्य पायाभूत सुविधा नसल्याने या क्षमतेचा पूर्ण वापर होत नाही. मजबूत रेल्वे नेटवर्क निर्माण झाल्यास मालवाहतूक सुलभ होईल, उद्योगांना चालना मिळेल आणि ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या शहरांशी जोडले जाणे सोपे होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

**केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुराव्याची मागणी**

या रेल्वे प्रकल्पासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे प्राधान्याने पाठपुरावा करावा, अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी केली. विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी रस्ते, महामार्ग आणि रेल्वे या तिन्ही क्षेत्रांमध्ये समान वेगाने विकास होणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

रेल्वे ही केवळ प्रवासाची सुविधा नसून आर्थिक विकासाचे महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामुळे नवीन रेल्वे मार्गांमुळे स्थानिक बाजारपेठा, कृषी उत्पादन, उद्योग आणि पर्यटन क्षेत्राला मोठा फायदा होईल, असे त्यांनी सांगितले.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार सन्मान

## हिवरा आश्रमात आज सुतार समाजाचा गुणवंत गौरव सोहळा

**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**हिवरा आश्रम,** शिक्षण, संस्कार आणि गुणवत्तेच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीला हातभार लावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी सुतार समाजाच्या वतीने रविवार, दि. १२ जुलै रोजी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ११ वाजता विवेकानंद आश्रम परिसरातील भगवान बालाजी मंदिर सभागृहात हा कार्यक्रम होणार आहे.

या सोहळ्यात भारत सरकारचे आयुष मंत्रालयाचे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. कार्यक्रमाची माहिती सुतार समाजाचे जिल्हाध्यक्ष अनंतराव राऊत यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्त्व प्राचार्य श्रीराम येरणकर राहणार असून, विशेष उपस्थिती म्हणून माजी आमदार डॉ. संजय रायमूलकर उपस्थित राहणार आहेत. यावेळी विवेकानंद आश्रमाचे अध्यक्ष आर. बी. मालपाणी, उपाध्यक्ष अशोक थोरहाते, प्रादेशिक परिवहन



अधिकारी मंदार टवलारकर, पोलीस उपनिरीक्षक देविदास फुलउंबरकर, सतीश वेरूळकर, रंजनाताई रायमूलकर, अलकाताई सुरोशे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

या सोहळ्यात शैक्षणिक क्षेत्र, स्पर्धा परीक्षा तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हा त्यांच्या यशाचा गौरव करण्यासोबतच समाजातील शिक्षण, संस्कार आणि प्रगतीच्या मूल्यांना प्रोत्साहन देणारा उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले.

याच कार्यक्रमानिमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये मूत्ररोगतज्ज्ञ डॉ. आनंद भुक्तर, मेंदू व मणका विकारतज्ज्ञ डॉ. मनोज भुक्तर, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. विनोद भुक्तर तसेच त्वचारोगतज्ज्ञ डॉ. गौरी सदावर्ते रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत.

या प्रेरणादायी कार्यक्रमास सुतार समाजातील सर्व समाजबांधव, पालक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष अनंतराव राऊत, जिल्हा संघटक आनंदमूर्ती गजानन जवरकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय राऊत, सचिव समाधान जंजाळ, माधवराव इंगळे, एकनाथ खानझोडे, समाधान सुरोशे, जिल्हा प्रवक्ता गणेश राऊत, तालुका अध्यक्ष एकनाथ राऊत आणि प्रसिद्धी प्रमुख संतोष थोरहाते यांनी केले आहे.

## मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी शैलेश सावजींची जनजागृती मोहीम

**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**डोणगाव,** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (SIR-2026) अभियानांतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे, यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी डोणगाव व परिसरात व्यापक जनजागृती मोहीम सुरू केली आहे. ऑटो रिक्षाद्वारे गावागावांत जाऊन मतदारांना माहिती देण्यात येत असून या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे.




या मोहिमेत माहितीपर फलक लावलेल्या ऑटोद्वारे आणि ध्वनिक्षेपकाच्या माध्यमातून नागरिकांना मतदार यादीतील नाव तपासणे, नवीन मतदार नोंदणी, नाव-पत्ता दुरुस्ती तसेच मृत व स्थलांतरित मतदारांची नावे वगळण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

या उपक्रमादरम्यान शैलेश सावजी यांनी शिक्षकांना विशेष आवाहन केले. "शिक्षक हा समाजातील सर्वाधिक विश्वासार्ह घटक असून विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मतदार नोंदणीचा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची ताकद त्यांच्यात आहे," असे त्यांनी सांगितले.

मतदार यादी ही लोकशाहीचा मूलभूत पाया असून कोणताही पात्र नागरिक मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

सावजी यांनी बीएलओ, ग्रामपंचायत पदाधिकारी, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, महसूल कर्मचारी, सामाजिक संस्था, युवक मंडळे आणि लोकप्रतिनिधींनीही या अभियानात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

या जनजागृती मोहिमेमुळे डोणगाव परिसरात मतदार नोंदणीबाबत जागरूकता वाढत असून नागरिक स्वतःहून मतदार यादी तपासण्यासाठी पुढे येत आहेत. लोकशाही अधिक सक्षम आणि पारदर्शक करण्यासाठी अशा मोहिमा उपयुक्त ठरत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

या उपक्रमामुळे नवीन मतदार, महिला, युवक तसेच स्थलांतरित नागरिकांना मतदार यादीतील नोंदी तपासण्याची संधी मिळत असून, आगामी काळात अचूक आणि अद्ययावत मतदार यादी तयार होण्यास मोठी मदत होणार आहे.

## श्री मुंगसाजी महाराज पतसंस्थेच्या देऊळगाव राजा शाखेचा वर्धापन दिन उत्साहात

**दिव्य मातृछाया**
**अतिक खान**

**देऊळगाव राजा :** श्री मुंगसाजी महाराज नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, चिखलीच्या देऊळगाव राजा शाखेचा पाचवा वर्धापन दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात स्थानिक संचालकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून तसेच श्री मुंगसाजी महाराज आणि श्री बालाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी पतसंस्थेच्या कार्याचा गौरव करत ग्राहकांचा विश्वास, पारदर्शक व्यवहार आणि उत्कृष्ट सेवेमुळे संस्थेने अल्पावधीत मोठी प्रगती साधल्याचे सांगितले. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देत पतसंस्था आर्थिक विकासाचे महत्त्वपूर्ण माध्यम ठरत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

आगामी काळातही संस्थेने ग्राहकाभिमुख सेवा देत प्रगतीचा आलेख कायम ठेवावा आणि समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमास राजेश तायडे, गोविंदराव झोरे, दीपक सेठ मल्लावत, एकनाथ सोनुने सर, ॲड. श्याम खैरे, हाजी इनायत खान कोटकर, रामदास डोईफोडे, पत्रकार संतोष जाधव, सरव्यवस्थापक व्ही. एन. ठेंग यांच्यासह शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन शाखाधिकारी भगवान इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. वर्धापन दिनाच्या यशस्वी आयोजनासाठी शाखेतील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या प्रसंगी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ग्राहकांच्या वाढत्या विश्वासामुळे शाखेच्या कामकाजात सातत्याने वाढ होत असल्याचे सांगितले. तसेच भविष्यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस व्यक्त केला. ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन तत्पर सेवा देणे हेच संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

श्री मुंगसाजी महाराज नागरी सहकारी पतसंस्थेने आपल्या कार्यपद्धतीत विश्वासार्हता, पारदर्शकता आणि ग्राहकहिताला नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळे संस्थेशी जोडलेल्या सभासद व ग्राहकांचा विश्वास अधिक मजबूत झाला आहे.

## बुलडाणा वन विभागात भूमी अभिलेख व मानसिक-भावनिक स्वास्थ्य विषयक कार्यशाळा संपन्न

**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**बुलडाणा** बुलडाणा वन विभागाच्या वतीने अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ज्ञानवृद्धीसह मानसिक व भावनिक स्वास्थ्यासाठी "भूमी अभिलेख" आणि "मानसिक-भावनिक स्वास्थ्य" या विषयांवर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. उपवनसंरक्षक जमीर मुनीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक वनसंरक्षक वैभव काकडे यांच्या अध्यक्षतेखाली ही कार्यशाळा पार पडली.

यावेळी सहाय्यक वनसंरक्षक वैभव काकडे यांनी अशा प्रशिक्षणांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, निर्णयक्षमता आणि प्रशासकीय कामकाज अधिक प्रभावी होत असल्याचे सांगितले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात भूमी अभिलेख विभागाच्या विभागीय वन अधिकारी श्रीमती शिल्पा सवडकर यांनी वन विभागाच्या जमिनींचे अभिलेख, सातबारा, फेरफार, नकाशे, सीमांकन तसेच महसूल व कायदेशीर प्रक्रियांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात मानद वन्यजीव रक्षक डॉ. वैशाली निकम यांनी मानसिक व भावनिक स्वास्थ्य, तणाव व्यवस्थापन आणि सकारात्मक दृष्टिकोन याबाबत मार्गदर्शन केले.



कार्यशाळेत वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध विषयांवर चर्चा केली. यावेळी वन परिक्षेत्र अधिकारी सुनील वाकोडे, स्वप्नील पवार, निलेश काळे, पंकज अडसपुरे, अंकुश येवले, सातपुते, उमेश गायकवाड यांच्यासह वनपाल व वनरक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यशाळेमुळे वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दैनंदिन कामकाजातील प्रशासकीय अडचणी सोडविण्यासाठी आवश्यक ज्ञान मिळाले. तसेच तणावपूर्ण परिस्थितीत संयम राखणे, मानसिक संतुलन टिकवणे आणि प्रभावी निर्णय घेणे याबाबतही उपयुक्त माहिती मिळाली. अशा उपक्रमांमुळे विभागाच्या कामकाजात अधिक सुसूत्रता आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होत असल्याचे उपस्थितांनी मत व्यक्त केले.

कार्यशाळेच्या माध्यमातून वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशासकीय तसेच वैयक्तिक विकासासाठी उपयुक्त मार्गदर्शन मिळाले. वन जमिनींच्या नोंदी, अभिलेख व्यवस्थापन आणि कायदेशीर बाबींची अचूक माहिती असल्यास विभागीय कामकाज अधिक पारदर्शक आणि प्रभावीपणे करता येते, यावर तज्ज्ञांनी भर दिला.

तसेच वन क्षेत्रात काम करताना येणाऱ्या विविध आव्हानांना सामोरे जाताना मानसिक स्थैर्य, सकारात्मक विचारसरणी आणि भावनिक संतुलन राखणे आवश्यक असल्याचे डॉ. वैशाली निकम यांनी सांगितले. या प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला असून भविष्यातील जबाबदाऱ्या अधिक सक्षमपणे पार पाडण्यासाठी ही कार्यशाळा उपयुक्त ठरेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# दूरदृष्टी नेतृत्वाचा प्रेरणादायी प्रवास

## संस्थाध्यक्ष डॉ. सुभाषजी लोहिया यांचा वाढदिवस मेहकरमध्ये उत्साहात साजरा

### विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती; सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस ठरला आगळावेगळा

**दिव्य मातृछाया**
**वृत्त संकलन**

**मेहकर:** सामाजिक, राजकीय आणि वैद्यकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आणि संस्थाध्यक्ष डॉ. सुभाषजी लोहिया यांचा वाढदिवस विविध उपक्रमांसह उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या विशेष सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, राजकीय पदाधिकारी, नागरिक आणि विद्यार्थ्यांची मोठी उपस्थिती



लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उदयजी सोनी होते. यावेळी सत्कारमूर्ती डॉ. सुभाषजी लोहिया यांच्यासह प्रमुख पाहुणे म्हणून महेश अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी मेहकरचे अध्यक्ष गोपालजी मोदानी, महेश विद्यामंदिरचे उपाध्यक्ष डॉ. भगवानजी झवर, मेहकर तालुका माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष सुभाषजी भुतडा, भाजपा आध्यात्मिक आघाडी पश्चिम विदर्भ प्रमुख सीतारामजी ठोकळे, भाजपा जिल्हा सचिव विजय पवार, भाजपा तालुका अध्यक्ष आकाश सास्ते, जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप इलग, भाजपा महिला शहर अध्यक्षा सौ. शिल्पाताई देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

याशिवाय प्राचार्य ज्योती मंत्री, मेहकर पत्रकार संघाचे अध्यक्ष गजानन देशमुख, ज्येष्ठ पत्रकार सिद्धेश्वर पवार, डॉ. पवनजी मंत्री, तंशीरामजी मानघाले आणि डॉ. हार्दिक सुभाषजी लोहिया (एम.डी. डर्मेटोलॉजिस्ट) यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची




सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. लोहिया यांच्या सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचा गौरव केला. ज्ञानदेव मानवतकर, सिद्धेश्वर पवार, प्रदीप इलग, गजानन देशमुख, सीतारामजी ठोकळ महाराज, उपप्राचार्य गायकवाड सर आणि दुर्गा वडूळकर मॅडम यांनी आपल्या मनोगतातून डॉ. लोहिया यांच्या दूरदृष्टी नेतृत्वाचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या वतीने समृद्धी गारोळे, यज्ञेश पितळे आणि योगी निंबेकर यांनी डॉ. लोहिया यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सत्काराला उत्तर देताना डॉ. सुभाषजी लोहिया यांनी भावनिक होत सर्वांचे आभार मानले.

वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविण्यात आले. सारंगपूर अंगणवाडीतील १५ विद्यार्थ्यांना प्राचार्य ज्योती मंत्री यांच्या हस्ते मोफत गणवेश वाटप करण्यात आले. तसेच अंत्री देशमुख येथील कन्हैया गोरक्षण सेवा ट्रस्टला गोसेवेसाठी आर्थिक मदत देण्यात आली. पंढरपूरजवळील अनाथ आश्रमासाठी अन्नदानाच्या उद्देशाने 'महेश परिवार'तर्फे विशेष देणगी देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रितेश बिजेवार यांनी प्रभावीपणे केले. सोहळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य ज्योती मंत्री, उपप्राचार्य काशिनाथ गायकवाड यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला नागरिक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

---

## शेतरस्त्यावरील अडथळा हटवून 20 फूट रस्ता खुला करण्याची मागणी; तहसीलदारांना शेतकऱ्यांचे निवेदन

**दिव्य मातृछाया**
**रवि ढवळे**

**सिंदखेडराजा** येथील राजवाडा परिसरातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीकडे जाणारा पारंपरिक शेतरस्ता तात्काळ खुला करून देण्याच्या मागणीसाठी विद्यमान तहसीलदार, सिंदखेडराजा यांच्याकडे लेखी निवेदन सादर केले आहे. अर्जदार अमोल जगन ठाकरे यांनी दिलेल्या निवेदनात गट क्रमांक १२५/५, १२५, १२३ तसेच लगतच्या गटांमधून अनेक वर्षांपासून वापरात असलेला सुमारे २० फूट रुंदीचा शेतरस्ता अडविण्यात आल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे नमूद केले आहे. या रस्त्यावरील अडथळ्यामुळे मशागत, पेरणी, फवारणी, खत वाहतूक तसेच पीक काढणीची कामे प्रभावित होत असून पर्यायी रस्ता उपलब्ध



नसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून रस्ता पूर्ववत खुला करावा व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनावर अमोल ठाकरे, राहुल जाधव, शाम ठाकरे, शरद जाधव, सखाराम मेहेत्रे, विजय मेहेत्रे, एकनाथ शेरकर, सुरेश चौधरी, पुंजाराम चौधरी आणि रुस्तुम ढवळे या शेतकऱ्यांनी स्वाक्षऱ्या करून मागणीला पाठिंबा दिला असून प्रशासनाने त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा सर्व शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

शेतरस्ता बंद झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी मोठा फेरा मारावा लागत असून वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाढत आहे. पावसाळ्याच्या हंगामात शेतीची कामे वेळेत पूर्ण करणे अत्यंत आवश्यक असते. मात्र रस्त्याच्या अडथळ्यामुळे शेतमालाची वाहतूक आणि शेतीसाठी आवश्यक साधने पोहोचविण्यात अडचणी निर्माण होत आहेत.

शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थितीचा आढावा घ्यावा. पारंपरिक वापरातील शेतरस्ता खुला करून देण्यात यावा, जेणेकरून शेतकऱ्यांना कोणताही अडथळा न येता शेतीची कामे करता येतील. प्रशासनाच्या निर्णयाकडे राजवाडा परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

---

## गंभीर मारहाण प्रकरणात आरोपीस दोन वर्षांचा सश्रम कारावास!

**दिव्य मातृछाया**
**विठ्ठल देशमुख**

**राहेरी बु :** किनगाव राजा पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गंभीर मारहाणीच्या प्रकरणात सिंदखेडराजा येथील मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने आरोपीला दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच आरोपीवर पाच हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे.

किनगाव राजा पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक ३०/२०२३ अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४, ३२५ आणि ३२६ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या नियमित फौजदारी खटला क्रमांक ६०/२०२३ मध्ये सरकार विरुद्ध गणेश श्रीराम बरबडे (वय ३६ वर्षे, रा. पिंपळगाव लेंडी, ता. सिंदखेडराजा) यांच्याविरुद्ध सुनावणी सुरू होती.

सदर प्रकरणातील पुरावे, साक्षी आणि तपासाच्या आधारे मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सिंदखेडराजा यांनी दिनांक १० जुलै २०२६ रोजी निकाल जाहीर केला. या निकालात आरोपी गणेश श्रीराम बरबडे यास दोषी ठरवत दोन वर्षे सश्रम कारावास तसेच पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार अरुण मोहिते (बकल क्रमांक १२९१) यांनी केला होता. सध्या ते पोलीस स्टेशन बीबी येथे कार्यरत आहेत. तपासादरम्यान त्यांनी आवश्यक पुरावे संकलित करून प्रकरण न्यायालयासमोर प्रभावीपणे सादर केले.

न्यायालयीन कामकाजात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोलीस कॉन्स्टेबल ज्ञानबा सोसे (बकल क्रमांक ३८७) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी न्यायालयीन प्रक्रियेत प्रभावीपणे कामकाज पाहून प्रकरणाच्या पाठपुराव्यात योगदान दिले.

या निकालामुळे गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे स्पष्ट झाले असून, गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी अशा निर्णयांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

या प्रकरणातील तपास प्रक्रिया, पुरावे सादर करणे आणि न्यायालयीन पाठपुरावा यामध्ये किनगाव राजा पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई करून पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस प्रशासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी स्पष्ट झाले.

न्यायालयाच्या या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांमध्ये कायद्याविषयी विश्वास अधिक दृढ झाला असून, गंभीर गुन्हे करणाऱ्यांना कायद्याचा धाक निर्माण होईल, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

---

# दूषित पाण्यापासून सावध राहा; सिंदखेडराजा नगरपरिषदेचे नागरिकांना आरोग्यविषयक आवाहन

## पावसाळ्यात जलजन्य आजारांचा धोका टाळण्यासाठी स्वच्छता आणि सुरक्षित पाणी वापरण्याचे आवाहन

**दिव्य मातृछाया**
**रवि ढवळे**

**सिंदखेडराजा :** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर दूषित पाण्यामुळे होणाऱ्या जलजन्य आजारांचा धोका लक्षात घेऊन सिंदखेडराजा नगरपरिषदेच्या वतीने नागरिकांना आरोग्यविषयक महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांनी पिण्याचे पाणी काळजीपूर्वक वापरावे, स्वच्छता राखावी आणि आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

पावसाळ्यात अनेकदा मुख्य जलवाहिन्या, पाईपलाईन जोडणीची ठिकाणे किंवा गळतीच्या भागातून गाळमिश्रित अथवा दूषित पाणी येण्याची शक्यता असते. त्यामुळे नागरिकांनी पिण्याचे पाणी नेहमी उकळून व गाळून वापरावे, असे नगरपरिषदेने स्पष्ट केले आहे. तसेच पाणी स्वच्छ आणि झाकण असलेल्या भांड्यात साठवावे, पाणी काढण्यासाठी स्वच्छ डावाचा वापर करावा, असेही सांगण्यात आले आहे.

पावसाळ्यात दूषित पाण्यामुळे अतिसार, उलट्या, ताप यांसारख्या आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे नागरिकांनी ताजे आणि गरम अन्न सेवन करावे. उघड्यावर विक्री होणारे अन्नपदार्थ टाळावेत. जेवणापूर्वी तसेच शौचानंतर साबणाने हात धुण्याची सवय लावावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

याशिवाय घराच्या परिसरात, गल्ल्यांमध्ये किंवा रस्त्यांवर पाणी साचणार नाही याची नागरिकांनी काळजी घ्यावी. साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती होऊन डेंग्यू, मलेरिया आणि चिकुनगुनिया यांसारख्या आजारांचा प्रसार होण्याची शक्यता असते. त्यामुळे परिसर स्वच्छ ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे नगरपरिषद प्रशासनाने सांगितले आहे.

घरातील नळ, पाईपलाईन किंवा पाणीपुरवठा यंत्रणेत गळती आढळल्यास ती तातडीने दुरुस्त करावी. तसेच मुख्य




जलवाहिनीत कोणतीही गळती किंवा समस्या आढळल्यास नगरपरिषद प्रशासनाला त्वरित माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांनी पाणी आणि स्वच्छतेबाबत आवश्यक खबरदारी घेतल्यास पावसाळ्यातील अनेक आजारांपासून बचाव करता येईल. स्वतःचे तसेच कुटुंबाचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी नगरपरिषदेला सहकार्य करावे, असे आवाहन उपनगराध्यक्षा सौ. दिपाली योगेश म्हस्के, नगरसेविका सौ. संगीता किशोर म्हस्के, गटनेते ॲड. संदीप सखाराम मेहेत्रे, नगरसेवक कैलास नारायण मेहेत्रे आणि नगरसेवक गौतम प्रकाश खरात यांनी केले आहे.

नगरपरिषदेने नागरिकांना पाणीपुरवठा, स्वच्छता आणि आरोग्य सुरक्षेबाबत विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. पावसाळ्यात पाण्यात होणारे बदल, गळती किंवा दूषित जलवाहिन्यांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने पिण्याचे पाणी उकळून, गाळून आणि योग्य पद्धतीने साठवून वापरावे. तसेच परिसर स्वच्छ ठेवून पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.